# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - 401 101, दुरध्वनी क्र. 819 2828

**// मध्यवर्ती भांडार विभाग //**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र./मनपा/मध्यवर्ती भांडार/ ७० /2025-26** **दि.२८ / ०४/2025**

## // परिपत्रक //

प्रति,

**सर्व खातेप्रमुख / विभागप्रमुख**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- सन 2025-26 या वित्तीय वर्षात महानगरपालिकेच्या वर्ग-4 कर्मचा-यांकरिता पावसाळी साहित्य (छत्र्या, रेनकोट व गमबूट) वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबत.**

**संदर्भ :- 1) शासन निर्णय क्रमांक: डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417 दि.05/12/2016.**
**2) मा. महासभा दि. 15/01/2021 ठराव क्र. 40 अन्वये.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र शासन निर्णयानुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत वरील संदर्भ क्र. 01 अन्वये शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्थायी चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दर दोन वर्षांनी विभागप्रमुख यांच्या शिफारसीने जे सफाई कामगार फिल्डवर काम करतात अशा कर्मचा-यांना छत्र्या, रेनकोट, गमबूट वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करणेबाबतचे DBT धोरण मा. महासभा ठराव क्र. 40 दि. 15/01/2021 अन्वये संदर्भ क्र. 02 अन्वये ठराव पारित झालेला आहे.

**परिशिष्ट "अ"**

**वस्तु विकत घेण्यासाठी ठरविण्यात आलेली रकमेचा तपशील**

| प्रत्यक्ष साईटवर काम करणारे चतुर्थश्रेणी कर्मचारी | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **स्त्री-पुरुष** | **अनुदान रक्कम (GST सह)** |
| 1. | रेनकोट | रु. 450/- मर्यादेपर्यंत |
| 2. | गमबूट | रु. 550/- मर्यादेपर्यंत |
| 3. | छत्री | रु. 300/- मर्यादेपर्यंत |

कृ.मा.प.

सन 2020-21 या वित्तीय वर्षापासुन दर दोन वर्षांनी महानगरपालिकेच्या वर्ग - 4 कर्मचा-यांकरिता पावसाळी साहित्य (छत्र्या, रेनकोट व गमबूट) वस्तुरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर (DBT) रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबत ठराव पारित झालेला आहे.

तथापी पावसाळा जवळ आल्याने यावर्षी सुध्दा वर्ग - 4 कर्मचा-यांकरिता पावसाळी साहित्य (छत्र्या, रेनकोट व गमबूट) देणे गरजेचे असल्याने सन 2025-26 या वर्षी पावसाळी (छत्र्या, रेनकोट व गमबूट) देणेकामी प्रत्येक खातेप्रमुखाने आपल्या विभागात कार्यरत कर्मचारी (प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे) यांची यादी निश्चित करुन व उक्त लाभार्थी कर्मचारी यांनी खरेदी केलेल्या वस्तुची पावतीची शहानिशी करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर योजनेत सुनिश्चित केलेल्या योजनेची रक्कम लाभार्थी कर्मचा-यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करणेबाबतची कार्यवाहीची पुर्तता करुन शिफारसीचे प्रमाणपत्रासह मध्यवर्ती भांडार विभागास देयक (GST सह) एकत्रितपणे कर्मचारी यादीसह सादर केल्यानंतर वर्ग-4 लाभार्थी कर्मचा-यांच्या क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात रोख रक्कम अदा करण्याची कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागामार्फत करण्यात येईल, तरी सदरची देयके (GST सह) तात्काळ जमा करण्यात यावी. मुदतीनंतर प्राप्त होणारी देयके अनुदानास पात्र राहणार नाही. तरी कृपया आपल्या मार्फत सर्व कर्मचा-यांना याबाबत अवगत करण्याबाबत विनंती आहे.

(सुनिल यादव)
**सह-आयुक्त (मध्यवर्ती भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**